॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२४–२५/३८६ दिनांक : २०/०२/२०२५

**परिपत्रक**

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:** रक्त दान व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान/शिबीराचे आयोजन करणे बाबत

संदर्भ: डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक (उ.शि) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. युएनआय/रासेयो/२०२५/विशी–१/ई–१३३२१२६ दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ ..

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त संपुर्ण महाराष्ट्र राज्यात रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर या दोन महत्वाच्या विषयांवर उपक्रम राबविण्याचे योजिले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपले संपुर्ण जीवन स्वातंत्र्यासाठी वेचले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबीर व नेत्रदान जनजागृती शिबीर आयोजित करणे म्हणजेच एखाद्याचे प्राण वाचविणे व त्याला जीवनदान देणे होय. जेणे करून या उपक्रमांबाबत समाजातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण करता येईल तसेच रक्तदान व नेत्रदान यासारख्या जीवनरक्षक देणग्यांच्या माध्यमातून होणा–या सकारात्मक परिणांमाबद्दल जागरूकता वाढविणे तितकेच महत्वाचे आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना एकक–सर्व अकृपी विद्यापीठे आणि संदगनीत महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालयांमधील रा.से.यो. एकक च्या माध्यमातून रक्तदान शिबीर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर सोबतच्या परिपत्रकानुसार आयोजित करण्याबाबत कळविले आहे. तसेच दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी महाशिवरात्र असल्याने सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ ऐवजी दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी नेत्रदानाचे शिबीर तसेच अधिकाधिक नेत्रदानाचे फॉर्म भरून घ्यावेत.

तरी त्यानुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात सोबतच्या परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ ऐवजी दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी रक्त दान व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान/शिबीराचे आयोजन करण्यात यावे, ही विनंती.

डॉ.मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.